आंधळा न्याय

लेखक : मतीन तारिक बागपती

अनुवादक : अब्दुर्रहमान शेख

''अल्लाह, असीम, दयावंत व कृपावंतच्या नावाने''

आंधळा न्याय

फार दिवसांपूर्वीची गोष्ट आहे. एका हिरव्यागार जंगलात एक सुंदर हंसाचा जोडा राहत होता. तो हंस आणि हंसनी दोघे खुशीत होते. जंगलातील प्रत्येक जनावर त्यांच्यावर प्रेम करत होते आणि त्यांचे ऐकत होते. ते दोघे सर्वांबरोबर हसत खेळत राहत होते. सर्व मजेत चालले होते.

एके दिवशी हंसनीने हंसाला सांगितले की आम्ही फार दिवसांपासून या जंगलात राहत आहोत. याच्या पुढील जगाची आम्हाला माहिती नाही. की तिथे काय आहे ? ऐकले आहे की जग फार मोठे आणि लांबलचक आहे. जगात सुंदर वस्तु आहेत, सुंदर शहरं आहेत आणि मनोहारी दृष्ये आहेत. आपण जग पाहिले पाहिजे. हंसनीचे हे म्हणने ऐकून हंस म्हणाला, ''घरातून बाहेर पडणे म्हणजे शंभर धोक्यांना सामोरे जाणे आहे. कधी उपाशी राहावे लागते. तर कधी आराम भेटत नाही तर कधी शत्रू

मागे लागतात. तू घरातच इज्जतीत आणि आरामात राहा, परंतु हंसनीने ऐकले नाही. ती जिद्द करु लागली. शेवटी हंसाला तिचे ऐकावे लागले.

दोघे तयार होऊन घरातून निघाले. एक लांबचा पल्ला गाठला. जंगलांना, नद्यांना, डोंगरांना मागे टाकात ते फार लांब उडत उडत गेले. उडताना त्यांनी रस्त्यात एक विराण वस्ती पाहिली. तिथे मनुष्य नव्हता की जनावर नव्हता. तुटलेली घरे होती. चहुकडे भग्नावस्थेतील घरे होती. त्यांना पाहून भीती वाटत होती. ते दृश्य पाहून हंसनीला भीती वाटू लागली. तिने भीतभीत हंसाला विचारले, "प्रिय हंस! ही वस्ती उजडली का गेली? येथील राहणारे शेवटी गेले कुठे?"

हंस म्हणाला, "काय तुला माहीत नाही की हे घुबडाच्या बसण्याचे स्थान आहे. मी मोठ्या लोकांकडून व म्हाताऱ्या लोकांकडून ऐकले की जिथे घुबड बसते ती जागा उजाड बनते. ती वस्ती बरबाद होते आणि चहुकडे विराण सन्नाटा निर्माण होतो. चला येथून लवकर निघू या."

घुबड तिथे लपलेला होता. त्याने ही सर्व बातचीत ऐकली होती. त्याला फार राग आला. तो त्यांच्याजवळ गेला आणि हंसाला जोरात म्हणाला, "अरे हे हंसाच्या पिल्ला! कुठे चालला आहेस. ही हंसनी माझी आहे. मला देऊन टाक."

हंस बेचारा परदेशी होता. पहिल्यांदा फार घाबरला, नंतर हिंमत करून म्हणाला, "अल्लाहची भीती बाळग, हंसनी आणि तुझा काय मेळ. ही हंसनी आहे आणि तू घुबड आहेस. कोणी आजपर्यंत घुबडाबरोबर हंसनीला कधी पाहिले आहे?"

घुबड मोठ्या आवाजात म्हणाला, "आम्ही या गोष्टीला जाणत नाही. हंसनी माझी आहे. तू हंसनीला येथेच सोडून निघून जा."

हंस फार घाबरला होता. त्याने घुबडाला राजी करण्यासाठी त्याची फार खुशामत केली. परंतु तो तर घुबडच होता. त्याच्यावर तिळमात्र परिणाम झाला नाही. गडबड गोंधळ ऐकून तिथे बरेच पक्षी गोळा झाले. निर्णय झाला की जवळच्या गावात जाऊन पंचायतीसमोर निर्णय मागू. याला घुबड तयार झाला. त्याला

पूर्ण विश्वास होता की त्याच्याच बाजूने निर्णय होईल.

सर्व मिळून गावात गेले आणि पंचासमोर मामला ठेवला. हंसाच्या दुर्दैवाने पंचसुध्दा नालायक आणि बेईमान होते. त्यांना अल्लाहची काहीच भीती नव्हती. अल्लाहचे कानून आणि स्वत:च्या जबाबदारीबद्दल त्यांना ज्ञान नव्हते. परलोकविषयी ते निष्काळजी बनले होते. ते लाचखोर होते, मनमानी करत होते आणि खूप चंगळ करीत होते.

दोघांचे ऐकून पंचानी विचार केला की हंस एक परदेशी आहे. परदेशीबरोबर सहानुभूती का ठेवावी? घुबड आपल्याच देशाचा आहे. त्याच्याशी आपले पुन्हा संबंध येतील. आज आपण घुबडाच्याच बाजूने निर्णय देऊन टाकू. उद्या हा आम्हाला कामी येईल. न्याय कोण पाहतो. बळी तो कान पिळी. न्याय सामर्थ्यवानांबरोबर असतो. आपण याविरोधी कसे जाणार? निर्णय घुबडाच्या बाजूने झाला. हंसनी घुबडाला देण्यात आली.

घुबड हंसनीला घेऊन अत्यानंदित झाला. परंतु हंस पंचांच्या न्यायाला पाहून डोके धरून बसला. तो रडत राहिला. काही

वेळाने त्याने डोके वर केले आणि उडण्यासाठी पंख फैलावले तर घुबडाचा आवाज आला. तो म्हणत होता, "हंस बंधु, थोडा थांब. घुबड उडून त्याच्याजवळ आला आणि म्हणाला, "पाहिलास, एकविसाव्या शतकातील पंचांचा न्याय? त्यांनी जाणूनबुजून हंसनी माझ्या हवाली केली. परंतु मी असा अन्यायी आणि अत्याचारी नाही की हंसनीला ठेवून घेईन. तुझी हंसनी तुला शोभेल! हा तर मी तुला फक्त तमाशा दाखविला. तुम्ही येथे येताच माझ्यावर आरोप लावला होता की या वस्तीवर घुबड बसले होते. घुबड जिथे बसते ती वस्ती उजाड होते. भाऊ! उजाड माझ्या बसण्याने नाही तर जेव्हा मनुष्य अन्यायी आणि अत्याचारी बनतो तेव्हा आपल्या निर्मात्याला आणि पालनहार अल्लाहला विसरून जातो. तो अशा स्थितीत मनमानी करू लागतो. सदाचार सोडून, न्यायाला त्यागून अत्याचार करू लागतो. तेव्हा अल्लाहचा कोप होतो आणि त्या अत्याचारी वस्तीला उलटून टाकतो. ही वस्तीसुध्दा अशाच अत्याचारी आणि अन्यायी लोकांची होती. अल्लाहने तिला उलटून टाकले आणि आज ती

उजाड बनली आहे. जा, निघा येथून अल्लाहची तुमच्यावर कृपा आहे अन्यथा तुम्हीसुध्दा या वस्तीबरोबर उलटले गेला असता."

हंस आणि हंसनी हे ऐकून उडून गेले.

सिंह आणि मनुष्य

एका जंगलाच्या शेवटच्या टोकावर एक म्हातारा सिंह राहत होता. तो फार चांगला होता. सर्व जनावर त्याला आपला नेता मानत होते आणि सुखात राहत होते.

सिंहाला एक बछडा होता. तो फार सुंदर आणि हुशार होता. जेव्हा म्हातारा सिंह मरू लागला तेव्हा आपल्या शेरूला तो म्हणाला, "बेटा आता मी मरणार आहे. अल्लाहचा कानून आहे की जो जन्माला येतो त्याला मृत्यू अटळ आहे. मीसुध्दा मरणार. माझ्या मृत्यूनंतर तुला माझी जागा घ्यावी लागणार आहे. मी तुला सर्वकाही शिकविले आहे. परंतु शेवटी एक उपदेश देतो की,

पाहा, ज्या जगात आम्ही राहतो ते विशाल आहे. अल्लाहने

यात उत्कृष्ठ वस्तू निर्माण केल्या आहेत. नद्या, डोंगर, जनावरं, माणसं इ. या सर्वांत मनुष्य अधिक अत्याचारी आहे. तू त्यापासून सावध राहा."

म्हातारा सिंह उपदेश देता देता मरून गेला. यापुढे तो काहीच बोलू शकला नाही. शेरूला वाटत होते की मनुष्याविषयी आणखी काही जाणून घेतले असते. परंतु आता उपयोग काय?

या गोष्टीला फार दिवस झाले. शेरू मोठा झाला. जंगलातील सर्व जनावरे त्याला भीत आणि त्याचे म्हणणे ऐकू लागले. तो अकडू लागला आणि मजेत राज करू लागला. त्याला आपल्या पित्याचा शेवटचा उपदेश होता, "माणसाशी सावध राहा." तो माणसाला पाहू इच्छित होता की कसा आहे. मनुष्यापासून माझा बाप जंगलाचा राजा होता तरी घाबरत होता.

माणसाच्या शोधात तो एकदा निघाला. फार दूर गेल्यानंतर त्याला एक हिरवेगार मैदान दिसले. त्यात एक घोडा चरत होता. तो अतिचलाख, अतिगतिवान आणि खूप ताजातवाना होता. त्याच्या उत्साहाला, चलाखीला आणि तेजीला पाहून सिंहाला

वाटले की हाच 'माणूस' असावा. तो भीतभीत त्याच्याजवळ गेला. अदबीने उभा राहिला आणि विचारले "काय तू माणूस आहे?"

घोडा आपल्या समोर सिंहाला पाहून घाबरला, त्याच्या तोंडातील हिरवा घास खाली पडला. सिंहाचे बोलणे ऐकून घोड्याला धीर आला आणि तो म्हणाला, "हे जंगलाच्या राजा! मी तर घोडा आहे. माणूस नाही. मी माणसासमोर कसा थांबू शकणार? दिवसभर टांगा आणि गाडीला ओढत राहणे, लगामाच्या ईशाऱ्यावर चालणे, पळत सुटणे, चैन नाही की आराम नाही. वरून कोड्याचे मार. हेच आहे माझे जीवन. माझ्यावर जे बीतत आहे, ते मलाच माहीत आहे.

घोड्याचे बोल ऐकून सिंह घाबरला त्याने विचार केला की मनुष्याला अवश्य पाहिले पाहिजे. तो पुढे गेला. समोरून एक उंट येताना दिसला. घोड्याहून ही चार हात उंच लांब लांब टांगा आणि मोठी मान उंच झाडांच्या पानांना फस्त करीत होता. सिंहाने विचार केला हाच मनुष्य असेल. सिंहाने विचारले तर

उंट म्हणाला, "माझ्या उंचीवर जाऊ नकोस. माणसाच्या हाताखालचा मी गुलाम आहे. ओझे ओढत राहणे सवारी वाहणे. पूर्ण दिवस फिरत राहणे. एका लहानशा निकेलने आम्हाला तो नाचवतो. आम्ही ओरडतो पण तो ऐकत नाही. शेवटी थकून भागून आम्ही चालत राहतो. या त्रासापासून कधी मुक्ती मिळेल ते अल्लाहच जाणो आणि या माणसापासून कधी सुटका मिळेल."

सिंह उंटाचे ऐकून आणखी घाबरला परंतु हिमतीनेपुढे गेला. रस्त्यात त्याला एक हत्ती दिसला. जो एका मोठ्या घरासारखा उभा होता. मोठा दिमाखदार, मोठमोठे कान, तोंडावर सोंड त्याला वाटले हाच मनुष्य असावा. त्याचे शरीर उंटापेक्षा जास्त मोठे आणि घोड्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने होते. तो घाबरत घाबरत हस्तीसमोर गेला. अदबीने सलाम केला आणि विचारले, "तुम्ही मनुष्य आहात काय?"

हत्तीने हे ऐकून सिंहाला वरून खालपर्यंत पाहिले. तो त्याच्या मूर्खपणावर हसला आणि म्हणाला, "कोणत्या पिडेचे नाव तुम्ही घेत आहात. त्यापासून अल्लाह रक्षण करो. मोठा अत्याचारी

आहे. मला पाहा किती धडधाकड आहे. सर्व काही नाक, कान, सोंड, शक्ती इ. अल्लाहने मला दिले आहे. परंतु माणसाने मला नाकेनऊ करून सोडले आहे. घोड्याच्या तोंडात लगाम, उंटाच्या नाकात नकेल आणि माझ्या मानेवर नेहमी स्वार होतो आणि हातात नेहमी अंकुश ठेवतो. थोडे इकडे तिकडे केले की अंकुशाचा मारा. किती सांगू, या माणसाने सर्वकाही राख करून टाकली. जरा 'उफ' करण्याचीसुध्दा हिंमत नाही. तुमचे भले यातच आहे की आपल्या म्हाताऱ्या पित्याच्या उपदेशावर चालावे आणि मनुष्याला पाहण्याचा विचार मनातून काढून टाकावा. नाहीतर सर्व मातीत मिळून जाईल."

इतक्या महाकाय हत्तीचे ऐकून सिंह अधिक घाबरला. तो परत घराकडे फिरला. त्या जंगलात एक मनुष्य लाकूडतोड्या लाकूड कापत होता. सिंह तिथे गेला आणि त्याला विचारले, "तू माणूस आहे काय?" लाकूडतोड्या सिंहाला पाहून फार घाबरला. परंतु हिंमतीने त्याने विचारले, तुझे काय काम आहे?" सिंह म्हणाला, "मी कधीच माणसाला पाहिले नाही. मी माणसाला

पाहू इच्छितो." तो म्हणाला, "मी माणूस आहे."

हे ऐकून सिंह मोठ्याने हसू लागला आणि रागात म्हणाला, "अरे! काय तू माणूस आहे? जंगलातील मोठमोठी जनावरे तुझ्यापासून भितात! आज मी तुझा समाचार घेणारच."

येवढे बोलून सिंह पुढे सरसावला की त्या माणसाचे काम करून टाकावे. परंतु लाकूडतोड्याने हुशारीने काम घेतले आणि म्हणाला, "हे जंगलाच्या राजा! तुम्ही तर फार शूर आहात. तुमच्यासमोर माझी काय हैसियत? थोडे थांबा, माझे एक काम आहे. मी ते माझ्या अशक्तपणामुळे पूर्ण करू शकलो नाही. अल्लाहने आता आपल्यासारखा बहादूर पाठवून दिला आहे. माझी थोडीसी मदत तुम्ही करू शकता काय? नंतर माझ्याशी जो व्यवहार करायचा तो करून टाका. मी या लाकडामधून ही खुंटी काढू इच्छितो. आपण लाकडाच्या ओडक्यात हाथ घाला आणि मी खुंटी काढून घेईल."

सिंहाला आपली प्रशंसा आवडली. त्याने आपल्या नादानपणात लाकडाच्या ओंडक्यात आपला हाथ टाकला.

लाकूडतोड्याने खुंटी त्वरित ओढून घेतली. सिंहाचे दोन्ही हात त्यात रूतून बसले. आता काय, भंयकर यातनेमुळे सिंहाच्या डरकाळ्या फुटू लागल्या.

हिरणी बहीण

मोठे हिरवेगार जंगल होते. हिरवीगार वनराई होती ती! अनेक जनावरं तिथे राहत होती. त्या जनावरांत एक हिरणी होती. ती फार सुंदर आणि भोळीभाबडी होती. सर्व जनावरे तिला प्रेमाने 'हिरणी बहीण' म्हणत असत.

त्या जंगलात एक लांडगा राहत होता. तो फार अत्याचारी आणि नालायक होता.

तो हिरणीच्या सुंदरतेवर जळत होता आणि वाट पाहून होता की कधी संधी मिळेल आणि तिला नष्ट करून टाकीन. त्याला जंगलातील जनावंराची भीती वाटत होती कारण ते सर्व हिरणीवर प्रेम करत होते.

हिरणीची दोन पिल्लं होती. एकाचे नाव एवना होते आणि

दुसऱ्याचे नाव बीना होते. हिरण बहीण जेव्हा कधी बाहेर जात तेव्हा लहान पिलं तिथे एकटेच राहात असे. ते दिवसभर खेळत असत.

लांडगा सर्व पाहत असे आणि मनात कुढत असे. शेवटी त्याने एकदा हिरणी घासपूस आणण्यासाठी बाहेर पडली तेव्हा तो तिथे आला आणि पिलांना फस्त करून गेला.

संध्याकाळी जेव्हा बहीण हिरणी परत आली तर तिला पिल्लं दिसली नाहीत. तिला फार वाईट वाटले व अति दु:ख झाले. जंगलातील ज्या जनावरांना कळले त्यांनासुध्दा फार दु:ख झाले. सर्वांना हिरणी बहिणीशी सहानुभूती होती. सर्वांनी विचार केला की हे लांडग्याचेच काम आहे म्हणूनच तो एकीकडे उभा राहून हसत आहे. सर्वांना वाटत होते की लांडग्याला शिक्षा झाली पाहिजे. परंतु हिरणी बहिणीने सांगितले, "मी काही सांगत नाही. अल्लाह पाहात आहे. तो सर्वकाही जाणतो. मी त्याच्यावरच भरोसा ठेवून आहे." हे ऐकून सर्व जनावरे हिरणी बहिणीची प्रशंसा करू लागले.

दुसऱ्या दिवशी योगायोगाने तिथे शिकारी आले. त्यांनी जंगलात जाळे लावले. लांडगा जाळ्यात फसून बसला. फार हातपाय मारले, परंतु काहीच फायदा झाला नाही आणि लाचार होऊन पडून राहिला. जेव्हा शिकारीने त्याला पकडले तेव्हा लांडगा मनात म्हणाला, पाप सर्वांना घेऊन बुडते. मी पापी होतो. मी हिरणीच्या पिल्लांना खाल्ले होते. याचा बदला मला अल्लाहने दिला.

तिरळा घुबड

फार दिवसांपूर्वीची गोष्ट आहे. जुन्या पिंपळाच्या झाडावर एक घुबड राहात होते. ते रात्री शिकार करण्यासाठी बाहेर पडत. त्याचा एक डोळा कधीतरी निकामी झाला होता. हे सर्व पक्षांना माहीत होते. म्हणून ते घुबडाच्या कान्या डोळ्याच्या बाजूला आपले घरटे बांधत असत जेणेकरून घुबडाच्या हल्ल्यापासून वाचावे. घुबड त्यामुळे उपाशी राहू लागला.

एकेदिवशी त्याला युक्ती सुचली. त्याने जंगलाच्या पक्षांना

एकत्र जमा केले आणि लहानशे भाषण दिले आणि सांगितले, "मी आता म्हातारा झालो. अल्लाहलाच माहीत की मी कधी मरणार आहे. म्हणून मी माझ्या गतकाळासाठी क्षमा मागतो. तुम्हीसुध्दा मला क्षमा करावी आणि माझे भय मनातून काढून टाका."

बिचारे भोळेभाबडे पक्षी त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून घुबडाकडे येऊ-जाऊ लागले. घुबडाला घरबसल्या भोजन मिळू लागले.

अशा प्रकारे पक्षी जंगलात कमी-कमी होऊ लागले. आज तर चिमणी राणी गायब झाली. काल निळा कबूतर आपल्या घरट्यात परत आला नाही. सर्वांनी विचार केला की घुबड राजाच्या मनात काहीतरी खोट आहे. त्या दिवशी कावळा घुबडाकडे उडून गेला आणि त्याच्या कान्या डोळ्याच्या बाजूला बसला. थोड्या वेळात तिथे एक चिमणी चूचू करत आली. घुबडाने चिमणीचे स्वागत केले आणि जवळ येऊन बसण्यास सांगितले. तेवढ्यात घुबडाने झडप मारली, परंतु चिमणी सावध

होती. ती उडून दूर गेली आणि म्हणाली, ''घुबडभाऊ, हे काय! तू तर शिकारीपासून पश्चात्ताप केला आणि क्षमा मागितली.''

घुबड काहीच म्हणाला नाही. म्हणतो तरी कसा! खोट्याचे पाय कधी असतात? खोटारड्याचे गुपित कधीतरी उघडतेच. अल्लाहकडून खोट्याला शिक्षा मिळते. कावळ्याने जंगलातील सर्व पक्षांना घुबडाच्या करतूतींपासून सावध केले. संध्याकाळपर्यंत सर्व पक्ष्यांनी एकत्र मिळून त्याला टोचून टोचून अति घायळ केले आणि त्या कान्या घुबडाला मारून टाकले.

प्रयत्नाचे फळ

एक होता पोपट आणि एक होती मैना. दोघेही एकाच झाडावर राहात होते. दोघांत मैत्री होती. दोघे एकत्र राहात होते. पोपट दु:खी असायचा मैनाला हे माहीत होते. ती पोपटाला दु:खाचे कारण विचारीत होती. परंतु पोपट तिकडे लक्ष देत नसे आणि दुसरीच गोष्ट बोलत असे.

शेवटी मैनाला राहवले नाही. एकदा तिने पोपटाला मुद्दामहून

विचारले, ‘‘हे पोपट भाऊ, आम्ही एका ठिकाणी फार दिवसांपासून राहातो. एकमेकांच्या सुखदु:खात सामील होतो. मग तुम्ही माझ्यापासून तुमची बैचनी का लपविता?''

पोपट हसला आणि म्हणाला, ‘‘हा तुमचा भ्रम आहे. मी अगदी आनंदी आहे.'' मैना म्हणाली, ‘‘होय, हे सर्व ठीक आहे. अल्लाहने तुम्हाला सर्वकाही दिले. ही सुंदरता, ही फळं फुलं इ. इ. रोज सुखात झोपता आणि सुखात उठता, तरीसुध्दा तुम्हाला काहीतरी चिंता लागून आहे. कृपया आज ते कारण सांगा. तुमच्या मनाचे ओझे कमी होईल.''

पोपटाने पाहिले की आता मैना ऐकणार नाही तर तो म्हणाला, ‘‘मैनाताई आजकाल जगात चहुकडे अफरातफरी माजलेली आहे. बागेत जितके पशुपक्षी आहेत, कुणाला कुणाशीही सहानुभूती नाही. तुम्ही पाहिले असेल की कावळा चिमण्यांच्या घरट्यात घुसतो आणि त्यांची अंडी आणि पिलं खावून टाकतो. घुबड आणि घारीच्या तोंडाला रक्त लागलेले आहे. चहुकडे अत्याचार बोकाळला आहे. जो थोडाफार शक्तिशाली आहे तो

अशक्तांवर अन्याय-अत्याचार करीत आहे. स्वार्थ, लोभ आणि लालसा प्रत्येकाची सवय बनली आहे. दुसऱ्याचा खून करणे, भांडण-तंटे हे रोजचेच होऊन बसले आहे. या सर्व कुकर्मांना पाहून मी घाबरून जातो."

पोपटाचे म्हणणे ऐकून मैना म्हणाली, "अच्छा! शहरप्रमुखाला शहराचे दु:ख वाटू लागले आहे."

पोपट म्हणाला, "हे शहराचे दु:ख नाही तर स्वत:चे दु:ख आहे. अत्याचार आणि हिंसाचार फार वाढेल तर आम्ही त्यातून वाचू शकत नाही. एखाद्या बाजूच्या घरात आग लागली तर आम्ही हे समजून निश्चिंत बसून राहावे की आग आता दूर आहे. हे बुध्दिमत्तेचे लक्षण नाही. बुध्दिमत्तेचे लक्षण हे आहे की जिथे आग लागली आहे तिथे जाऊन तिला विझवा. यामुळे आग पसरण्यास वाव मिळणार नाही. नाहीतर क्षणार्धात वस्तीला जाळून खाक करील."

मैनाताईला कळून चुकले आणि पोपटदादाला ती म्हणाली, "आता काय केले पाहिजे?"

पोपट म्हणाला, "जर तू मदत केली तर फार काही केले जाऊ शकते. आम्ही एकत्र मिळून जनावरांकडे जाऊ त्यांना समजावून सांगू. त्यांना हिंसाचार आणि अत्याचारापासून दूर राहाण्याची शपथ देऊ आणि सरळमार्गावर चालण्याचे आश्वासन घेऊ."

मैना म्हणाली, "मी अवश्य तुमची मदत करीन आणि पूर्ण साथ देईन. हे काम तर झालेच पाहिजे. जर बागेत अधिक बिघाड आला तर त्याच्या लपटीत सर्व येतील. गव्हाबरोबर कीडे रगडले जातील."

दोघांनी चांगला विचार केला आणि मोठ्या धैर्याने प्रचारकाचे काम सुरू केले. सर्व जानवरांना सुखशांतीने राहण्याचे फायदे आणि अत्याचाराचे हिंसाचाराचे दुष्परिणाम दाखवून दिले. अल्लाहने त्यांच्या या कार्याला समृध्दी व सफलता दिली. प्रत्येक जनांवराने दुराचारापासून दूर राहण्याची शपथ घेतली आणि त्यासाठी पश्चात्ताप केला. पूर्ण बागेचा चेहरामोहरा बदलून गेला. चहुकडे आनंद पसरला आणि शांतता नांदू लागली.

लोमडीचे धाडस

सकाळचा मंगल समय होता. थंडथंड हवा वाहत होती. पूर्वेकडून सूर्योदय होत होता. जंगलात चहूकडे हिरवागार गालिचा अंथरला होता. पक्षी रात्रीच्या आरामानंतर आपापल्या घरट्यातून एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडत होते. दुसरीकडे हरण, ससे आणि दुसरे जनावर खेळत बागडत होती.

याच वेळी एक भोळी-भाबडी लोमडी चरण्यासाठी बाहेर पडली. जंगलाच्या मनोहारी वातावरणाला पाहून ती खूश झाली होती. ती आपल्या ठिकाणावर पोहचलीसुध्दा नव्हती की एक शिकारी कुत्र्यांचा झुंड समोरून येताना तिने पाहिला. त्यांना पाहून ती फार घाबरली. ती आपले खाणेपिणे सोडून जीव वाचविण्यासाठी सुसाट पळू लागली. एका मोठ्या जगली कुत्र्याने तिचा पाठलाग सुरु केला!

जीव सर्वांना अतिप्रिय असतो. तिच्यात जितकी शक्ती होती त्याप्रमाणे ती वेगाने पळत होती. शेवटी पाठलाग करणारा शिकारी कुत्रा होता. हळूहळू दोघांमधील अंतर कमीकमी होत

गेले. लोमडी थकून गेली होती. ती फार संकटात सापडली. एखादे झुडूप किंवा वनराई लपण्यासाठी दिसत नव्हती. आता करणार तरी काय? या खतरनाक जनावराबरोबर कसा मुकाबला करायचा?

अशा संकटसमयी अल्लाहची आठवण होते. अल्लाह तर असहाय आणि कमजोरांचा मदतगार आहे. तिने अल्लाहचे स्मरण केले. तिला धाडस मिळाले. तिने विचार केला,

"अल्लाह सर्वांचा मालक आहे. मृत्यू व जीवन त्याच्याच हातात आहे. जर अल्लाह मारू इच्छितो तर कोणीही वाचवू शकत नाही आणि जीवंत ठेवू इच्छित असेल तर कोणी काहीही वाकडे करू शकत नाही, म्हणून मी चिंता करणार नाही. मला अल्लाहवर निष्ठा ठेवली पाहिजे आणि धैर्याने काम केले पाहिजे. जर अल्लाह मला जीवन देईल तर हा कुत्रा काय? सारे कुत्रे जरी आले तरी काहीही करू शकणार नाहीत!"

हा विचार मनात आल्यावर ती जागीच थांबून राहिली आणि कुत्र्याची वाट पाहू लागली. कुत्रा जोरात पळत येत होता.

लोमडी अल्लाहच्या भरोशावर जागीच उभी राहिली होती. तिने कुत्र्याचा मुकाबला करण्याची युक्ती केली.

जेव्हा कुत्रा तिच्याजवळ पळत पळत आला लोमडीने जोरात आपले खूर त्याच्या डोळ्यांत खुपसले. कुत्रा या अचानक हल्ल्यासाठी तयार नव्हता. खुरांच्या आघातामुळे त्याचे दोन्ही डोळे फुटले. तो आंधळा झाला आणि लोमडीचा जीव वाचला. तिने अल्लाहची कृतज्ञता व्यक्त केली आणि जंगलात पळाली.

समाप्त